# *ANTI DOWRY MOVEMENT, BOMBAY.*

## हुंडा विरोधी चळवळ, मुंबई

***4/50 Vishnu Prasad 'B' Society, Shahajiraje Marg, Freedon Fighter Mamasheb Kulkarni Chowk, Vile Parle (E) Mumbai 400 057. Tele.No.022-26836834 / 26836132.***


---

मा. संपादक, वृत्त विभाग,

सविनय सादर प्रणाम,

हुंडा विरोधी चळवळ, मुंबई ही संस्था स्त्री उन्नतीच्या क्षेत्रात गेली ४६ वर्षे अव्याहतपणे कार्य करीत आहे. संस्थेच्या संस्थापक सदस्या कै. सौ. राधाबाई कुलकर्णी, ज्यांना स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भूमिगत असलेल्या साने गुरुजींना सहाय्य करण्याचे भाग्य लाभले त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी जिल्हास्तरावर विधायक कार्यकर्ती पुरस्कार समाजसेवी महिलांसाठी दिला जातो. यंदा हा पुरस्कार जालना जिल्ह्यासाठी असून या पुरस्कारासंबंधी खालील निवेदनास कृपया आपल्या
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

आ. नम्र,

( आशा कुलकर्णी )
महासचिव, हुंडा विरोधी चळवळ, मुंबई.

## *** निवेदन ***

हुंडा विरोधी चळवळ, मुंबई या सामाजिक संस्थेने जालना जिल्ह्यातील तळागळात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या एका समाजसेवी महिलेसाठी कै. सौ. राधाबाई कुलकर्णी विधायक कार्यकर्ती पुरस्कार प्रदान करण्याचे योजिले आहे. पुरस्काराचे यंदा १२ वे वर्ष असून पुरस्कारासाठी अर्ज शुक्रवार दिनांक १० मे २०१९ पर्यंत विहित नमुन्यात करणे गरजेचे आहे. तसेच जालना जिल्ह्यात किमान १० वर्षे सामाजिक कार्यात योगदान गरजेचे (राजकीय पक्षांसाठी कार्य करणाऱ्या महिलांचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.) पुरस्कार मुंबई येथे २६ मे २०१९ रोजी विशेष समारभात दिला जाईल. पुरस्काराचे स्वरूप : मानधन रु. दहा हजार, सन्मानपत्र, साडी-चोळी-श्रीफळ व ग्रंथभेट असे असते. अधिक माहितीसाठी संपर्क : आशा कुलकर्णी, महासचिव - हुंडा विरोधी चळवळ, ४/५० विष्णू प्रसाद 'बी' सोसायटी, शहाजी राजे मार्ग, विले पार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७.
दूरध्वनी : ०२२-२६८३६८३४ / २६८३६१३२. भ्रमणध्वनी : ९८१९३७३५२२ / ९८१९५३९१९३.

****************************************

**ASHA KULKARNI**

HON. GEN. SECRETARY
ANTI-DOWRY MOVEMENT, BOMBAY

**ANTI-DOWRY MOVEMENT, BOMBAY**
4/50, Vishnu Prasad 'B' CHS, Shahaji Raje Marg,
Freedom Fighter Mamasaheb Kulkarni Chowk,
Vile Parle (East), Mumbai - 400 057.
Tel.: 022-26836834 / Telefax : 022-26836132
Mob.: 9819373522 / 9819539193
E-mail : antidowry498a@gmail.com
Website : www.antidowrymovement.com

सविनय सादर प्रणाम,

हुंडा विरोधी चळवळीबद्दल आपणास माहिती असेल. चळवळीच्या संस्थापक सदस्य कै. सौ. राधाबाई कुलकर्णी यांचे स्मरणार्थ मधील बारा वर्षांपासून दरवर्षी विधायक कार्यकर्ती पुरस्कार देण्यात येतो. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात १९४२ ते १९४७ दरम्यान जेव्हा पूज्य साने गुरुजी ब्रिटिश सरकारच्या ससेमिऱ्यापासून वाचण्यासाठी भूमिगत झाले आणि वेशांतर करून वणवण करीत असत तेव्हा त्यांना स्वैपाक करून पोटभर जेऊ घालायचे भाग्य लाभलेल्या सौ. राधाबाई उर्फ मामी (माझी आई) अत्यंत मितभाषी सोशिक आणि सुग्रण असलेल्या गृहिणी होत्या. त्यांचे हुंडा विरोधी चळवळीच्या प्रदीर्घ वाटचालीत स्वतःचे राहते घर चळवळीच्या कार्यालयासाठी देण्यापासून तर पीडीत महिलांचे सांत्वन करून प्रसंगी त्यांना चार घास भरवून धीर देण्यापर्यंत फार मोठे योगदान होते. त्यांच्या स्मरणार्थ जाहीर होत असलेला पुरस्कार या वर्षी जालना जिल्ह्यासाठी असून तळागळात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या समाजसेवी महिलांसाठी आहे. पुरस्काराचे स्वरूप : सन्मानचिन्ह, मानपत्र, साडी-चोळी-श्रीफळ, ग्रंथभेट आणि मानधन रु.१०,०००/- असे असते. यंदा हा पुरस्कार रविवार दिनांक २६ मे रोजी मुंबई येथे चळवळीच्या ४६ व्या वर्धापन दिनानिमित्ताने एका विशेष समारंभात दिला जाणार आहे. आजवर ज्या अकरा जिल्ह्यातील विधायक कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला त्यात खालील नावांचा समावेश होता.

(१) प्रा. शीला पाटील - जळगाव (२००८)
(२) डॉ. सुधा कांकरिया - अहमदनगर (२००९)
(३) एडव्होकेट संगीता भाकरे - अकोला (२०१०)
(४) श्रीमती नलिनी फुसे - अमरावती (२०११)
(५) डॉ. रश्मी बोरीकर - औरंगाबाद (२०१२)
(६) प्रा. सविता शेट्ये - बीड (२०१३)
(७) डॉ. तेजस्विनी भुस्कुटे - भंडारा / गोंदिया संयुक्त (२०१४)
(८) डॉ. इंदुमती लहाने - बुलडाणा (२०१५)
(९) डॉ. पारोमिता गोस्वामी - चंद्रपूर (२०१६)
(१०) श्रीमती मीना भोसले - धुळे (२०१७)
(११) श्रीमती शुभदा देशमुख - गडचिरोली (२०१८)
(१२) २०१९ चा पुरस्कार जालना जिल्ह्यासाठी.

आपणास विनंती की या पुरस्काराला योग्य अशी कोणी महिला आपल्या परिचयाची असल्यास सोबतच्या अर्जाचा विहीत नमुना तिला द्यावा आणि माझ्याकडे १० मे २०१९ पर्यंत वरील पात्यावर माहिती पाठवावी. आपल्या सहकार्याची अपेक्षा करते.

आ. नम्र,
आशा कुलकर्णी.

महासचिव, हुंडा विरोधी चळवळ, मुंबई.